**बृहन्मुंबई महानगरपालिका**

कामगार विभाग

क्र.प्रकाअ/४९४/एमसी दि.२०.०७.२०२६

**<u>सुचना पत्र</u>**

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील देवनार पशुवधगृहाच्या आस्थापनेवरील 'कामगार' या संवर्गातील ३८ रिक्त पदे भरण्याकरीता क्र.प्रकाअ/८०२/एमसी दि.२२.०१.२०२६ अन्वये जाहिरात प्रसारित करण्यात आली होती. तदनुषंगाने दि.०४.०५.२०२६ रोजी घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेचा निकाल दि.०९.०६.२०२६ रोजी महानगरपालिका संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची निवडीच्या निकषानुसार सामाईक गुणवत्ता यादी दिनांक१४.०७.२०२६ रोजी आणि उमेदवारांची कागदपत्रांच्या पडताळणीसापेक्ष तात्पुरती निवडयादी दिनांक१७.०७.२०२६ रोजी महानगरपालिका संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**तात्पुरत्या निवड यादीतील अनु.क्र.१ ते ३८ मधील उमेदवारांनी जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे सर्व मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रे तसेच इतर आवश्यक कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या पडताळणी करिता दि.२७.०७.२०२६ ते दि.२८.०७.२०२६ या कालावधीमध्ये सकाळी ११.३० वाजता प्रमुख कामगार अधिकारी कार्यालय, सहावा मजला, नवीन इमारत, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, महानगरपालिका मार्ग, मुंबई-४००००१ येथे उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. <u>या कालावधी व्यतिरिक्त अन्य कोणत्याही दिनांकास कागदपत्रे पडताळणी करिता उपस्थित रहाण्याची उमेदवारांची विनंती मान्य केली जाणार नाही. याची नोंद घेण्यात यावी.</u>**

**(अ) कागदपत्रे पडताळणीकरीता उपस्थित राहणा-या उमेदवारांकरीता सर्वसाधारण आवश्यक सूचनाः-**

1. जाहिरात क्र.प्रकाअ/८०२/एमसी दि.२२.०१.२०२६ च्या अनुषंगाने उमेदवाराने सादर केलेल्या ऑनलाईन अर्जाची हार्ड कॉपी प्रिंट तसेच, परीक्षेच्या प्रवेश पत्राची छायांकीत प्रत सादर करणे आवश्यक आहे. तसेच फोटो असलेले ओळखपत्र (आधारकार्ड, पॅनकार्ड) आवश्यक आहे.

2. सोबत जोडण्यात आलेल्या अर्जाच्या विहित नमुन्यामध्ये परिपूर्ण माहिती, निळे किंवा काळे बॉलपेनद्वारे ठळक अक्षरामध्ये नमूद करून सदर अर्ज सोबत आणणे आवश्यक आहे.

3. माध्यमिक शालांत परीक्षा गुणपत्रक व माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

4. सक्षम प्राधिका-यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास), सादर करणे आवश्यक आहे.

5. जन्मदिनांक समाविष्ट असलेले शाळा सोडल्याचा दाखला / जन्मदाखला /एस.एस.सी. प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

6. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. सामाजिक व समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या उमेदवारास महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

7. 'कामगार' या संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता प्रसारित केलेल्या जाहिरात क्र.प्रकाअ/८०२/एमसी दि.२२.०१.२०२६ अन्वयेच्या जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती आणि पदभरतीकरिता केलेल्या

ऑनलाईन अर्जामधील नमूद तपशीलाच्या अनुषंगाने, उमेदवाराने सर्व शैक्षणिक अर्हतेची मुळ प्रमाणपत्र, सामाजिक व समातंर आरक्षणांतर्गत आवश्यक असलेली मूळ प्रमाणपत्रे आणि इतर आवश्यक प्रमाणपत्रे तसेच अन्य सर्व मूळ प्रमाणपत्रे पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक आहेत. तसेच, सदर सर्व कागदपत्रांचे स्वसाक्षांकित छायांकित प्रती ऑनलाईन अर्जाच्या हार्ड कॉपी सह सादर करणे आवश्यक आहे.

8. समांतर आरक्षणांतर्गत अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी, जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या शासन निर्देशानुसार आवश्यक ती **सर्व मूळ प्रमाणपत्रे** सादर करणे आवश्यक आहे. (महिला आरक्षण / माजी सैनिक / प्रकल्पग्रस्त /भूकंपग्रस्त / खेळाडू /अनाथ / दिव्यांग/बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये प्रशिक्षण घेऊन NCTVT परिक्षा उत्तीर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र)

9. उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (3 छायांकीत प्रतीसह) सादर करणे आवश्यक आहे (अ.जा. व अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळून)

10. विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा प्रतिज्ञापत्र आणि नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करणे आवश्यक आहे.

11. दिव्यांग आरक्षणांतर्गत अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी किमान 40% दिव्यांगत्व असल्याबाबतचे महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.अप्रकि-2018/प्र.क्र.46/आरोग्य-6 दि.14.09.2018 मधील निर्देशांनुसार विहित नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र तसेच, वैश्विक ओळखपत्र (UDID)सादर करणे आवश्यक आहे.

12. लेखनिकाची सुविधा घेतलेल्या दिव्यांग कर्मचा-यांनी लेखनिकाची शैक्षणिक पात्रता ही कामगार पदाच्या शैक्षणिक अर्हतेपेक्षा कमी असल्याबाबतचे लेखनिकाचे प्रतिज्ञापत्र त्यांच्या शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह सादर करणे आवश्यक आहे.

13. उमेदवाराने लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे.

14. पोलिस ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणेकरीता, उमेदवारांनी जन्मदिनांका पासून ते सद्यस्थितीतील त्यांचा रहिवास पत्ता, रहिवासाचा कालावधीचा तपशील आणि संबंधित सर्व जिल्हयातील संबंधित जिल्हा पोलिस अधीक्षक (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून) यांच्या कार्यालयाचा पत्ता याबाबतची माहिती सोबत संलग्नित नमुन्यामध्ये भरून आणणे आवश्यक आहे.

**15. वर नमूद केलेल्या सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रे / इतर आवश्यक कागदपत्रांच्या मूळ प्रतींसह, स्वयं साक्षांकीत प्रतींचा एक संच पडताळणी करीता सादर करणे आवश्यक आहे.**

16. कागदपत्रे पडताळणी कार्यक्रमादरम्यान उमेदवाराने गैरवर्तणुक केल्यास उमेदवाराविरोधात नियमोचित / कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

17. उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणी कार्यवाही करिता स्वखर्चाने उपस्थित राहावे.

18. उपरोक्त बाबत काही शंका असल्यास 'कामगार विभाग' दूरध्वनी क्र.022-22620251 विस्तारीत क्र.4691 वर संपर्क साधावा.

19. भरती प्रक्रीयेअंतर्गत वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सदर संकेतस्थळ उमेदवारांनी वेळोवेळी पहावे.

**(ब) उमेदवारांकरिता सूचना-**

सदर उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज, परिक्षेचे प्रवेश प्रत्र, पॅनकार्ड, आधारकार्ड व अन्य सर्व कागदपत्रे, नजीकच्या कालावधीतील तीन फोटो व जन्मतारखेच्या पुराव्यासह तसेच, दिव्यांग आरक्षणांतर्गत अर्ज केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत दिव्यांग कल्याण विभागाचा शासन निर्णय क्रमांक दिव्यांग२०२५/प्र.क्र.१०/ईऑफीस क्र.१३३९०२०/कार्यासन-३ दिनांक०९.१०.२०२५ नुसार दिव्यांगत्वाचे वैश्विक ओळखपत्र (UDID) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.शासन निर्णय दि.14.09.2018 नुसारचे नविन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र, APPENDIX-I, APPENDIX-II, UDID CARD, लेखनिकाचे शैक्षणिक कागदपत्रे आणि हमीपत्रासह उपस्थित राहावे.

| | |
|---|---|
| सही/- दि.२०.०७.२०२६ | सही/ दि.२०.०७.२०२६ |
| सह प्रमुख कामगार अधिकारी (शहर) | प्रमुख कामगार अधिकारी |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

<u>कामगार विभाग</u>

<u>'कामगार' सरळसेवा भरती -२०२६ कागदपत्रे पडताळणीकरिता अर्जाचा नमूना</u>

उमेदवाराने त्याचे अलिकडेच काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून फोटोवर स्वतःची स्वाक्षरी करावी. 2.5 से.मी. x 3 से.मी.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील महाव्यवस्थापक देवनार पशुवधगृहाच्या आस्थापनेवरील 'कामगार' संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता प्रसारित करण्यात आलेल्या जाहिरात क्र.प्रकाअ/८०२/एमसी दि.२२.०१.२०२६ नुसार मी ऑनलाईन अर्ज सादर केला आहे. महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दि.१७.०७.२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवड यादीमध्ये माझा अनु. क्र.      असा आहे.

1) (अ) ऑनलाईन अर्जाचा क्रमांक: ________________________________(प्रत सोबत जोडली आहे.)

(ब) ऑनलाईन अर्जानुसार, संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) (मराठीत):____________________________

(इंग्रजीत) :____________________________________

नविन नाव/बदललेले नाव: श्री/श्रीम.:- ______________________________________________

(क) विवाहित महिला असल्यास, लग्नापूर्वीचे नाव: श्री/श्रीम.__________________________________

(संबंधित पुराव्यांची प्रत सोबत जोडली आहे.)

(ड) वडिलांचे / पतीचे संपूर्ण नाव :-_________________________________________________

2) (अ) पत्रव्यवहाराचा पत्ता : ______________________________________________

: ______________________________________________

(ब) कायम पत्ता :- : ______________________________________________

: ______________________________________________

ई-मेल:- : ____________________________________________

भ्रमणध्वनी क्र. : ____________________________________________

3) लिंग: पुरुष स्त्री इतर

4) (अ) उमेदवाराचा स्वत:चा जात प्रवर्गासमोर (√) असे चिन्ह करा.

| अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आदुध | सा .शै.मा.व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | --- | --- | --- |

(ब) उमेदवाराने ऑनलाईन अर्जात caste category applying या रकान्यामध्ये नमूद केलेल्या जात प्रवर्गासमोर (v) असे चिन्ह करा.

| अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आदुघ | सा.शै.मा.व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

(क) ऑनलाईन अर्जामध्ये समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास (v) असे चिन्ह करा.

| महिला | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | खेळाडू | NCTVT | अनाथ | दिव्यांग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

(ड) समातंर आरक्षणाचे प्रमाणपत्र निर्गमित करणा-या : ______________________________________

संबंधित सक्षम प्राधिका-याचे पदनाम, प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक__________________________

5) जात/पोटजात/प्रवर्ग असल्यास :_________________________________________________

जात प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक: _______________________________प्रत जोडली आहे / नाही.

जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक : _________________________ प्रत जोडली आहे / नाही

6) उमेदवार दिव्यांग आहे का ? असल्यास दिव्यांगत्वाचा प्रकार / प्रवर्गाच्या खालील रकान्यात (v) असे चिन्ह करुन किमान 40% दिव्यांगत्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडली आहे / नाही

| अ | ब | क | ड | ई |
|---|---|---|---|---|
| | | | | |

7) उन्नत व प्रगत गटात मोडत असल्यास, प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक: _________________________
(अ.जा. व अ.ज. प्रवर्ग तसेच गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गात निवड झालेल्या महिला उमेदवार वगळून)

8) अ) जन्मदिनांक:

| दिनांक | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

ब) ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळीचे वय :

| दिनांक | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

क) जन्म दाखला / शाळा सोडल्याचा दाखला अनुक्रमांक व दिनांक :__________नमूद करुन प्रत सोबत जोडणे

9) अ) शैक्षणिक अर्हता (संबंधित गुणपत्रके / प्रमाणपत्र/कागदपत्रे प्रत सोबत जोडली आहे.)

| शैक्षणिक अर्हता | शालांत परीक्षा मंडळ / विद्यापीठाचे नाव | एकूण गुण/पैकी | टक्केवारी | मराठी विषयात प्राप्त केलले एकुण गुण | आसन क्रमांक व उत्तीर्ण दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| एस.एस.सी | | | | | |

10) (अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? होय/नाही

(ब) शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

11) (अ) उमेदवाराविरूद्ध पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित वा प्रस्तावित आहे का ? होय/नाही

(ब) असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा

( संबंधित कागदपत्रांची प्रत सोबत जोडली आहे.)

14) (अ)सध्या अर्जदार इतरत्र (शासकीय/निमशासकीय)

नोकरीस आहे का ? होय/नाही

(ब) असल्यास त्याबाबतचा तपशील देऊन

सध्याच्या नियोक्त्याचे 'ना हरकत' प्रमाणपत्र जोडावे.

16) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आहे का ?

असल्यास त्याची प्रत सोबत जोडावी.

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/ करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास तसेच उपरोक्त दिलेल्या माहितीच्या आधारे नियुक्ती झालेली असल्यास सेवेतून कमी केल्यास, त्याबाबत माझी तक्रार रहाणार नाही. अर्जाव्दारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्याविरूद्ध कायदेशीर कारवाई करू शकते याची मला जाणीव आहे.

आपला / आपली विश्वासू,

(अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी)

दिनांक:

# **महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 मधील प्रतिज्ञापनाचा नमुना -अ**

## **प्रतिज्ञापन**

## **नमुना - अ (नियम 4 पहा)**

**दिनांकः**

मी, श्री./श्रीम./कुमारी ---------------------------------------- श्री. -------------------- --------------------- यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ------ वर्षे, राहणार --------------- याद्वारे असे जाहीर करतो/करते की,

(1) मी 'कामगार' पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

(2) आज रोजी मला ------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक 28 मार्च 2005 नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------ आहे (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा).

(3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2005 व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल यांची मला जाणीव आहे.

ठिकाण:

दिनांक: सही/-

नाव-

बृहन्मुंबई महानगरपालिका

<u>कामगार विभाग</u>

बृहन्मुंबई महागनरपालिकेतील महाव्यवस्थापक देपगृहाच्या आस्थापनेवरील 'कामगार' सरळसेवा भरती -२०२६ अंतर्गत तात्पुरत्या स्वरूपात निवड झालेल्या उमेदवारांचे वैद्यकीय परिक्षण आणि पोलिसांकडून चारित्र्य विषयक पडताळणी करण्याकरिता सादर करावयाची वैयक्तिक माहिती.

- ➔ उमेदवाराचे नाव -
- ➔ ऑनलाईन अर्जाचा क्र. -
- ➔ तात्पुरत्या निवड यादीतील अनु.क्र. -
- ➔ भ्रमणध्वनी (मोबाईल ) क्रमांक -
- ➔ ईमेल आयडी -

उमेदवाराचा निवासाचा पत्ता(पिन कोडसहित) (जन्मापासून आत्तापर्यंतचे सर्व पत्ते वास्तव्याच्या कालावधीसह नमूद करावेत) -
१)

२)

सदर पत्यांच्या अनुषंगाने संबंधित पोलिस आयुक्त /अधिक्षक /निरिक्षक कार्यालयाचा पत्ता (पिन कोडसहित)-
१)

२)

उमेदवाराची उंची ........फुट ........इंच वजन......किलो
शरीराची ठेवण किरकोळ/मध्यम/सुदृढ शरीराचा वर्ण ...................
वैयक्तिक खूण -................. नेत्र वर्ण.........................

उमेदवाराचे नाव/स्वाक्षरी व दिनांक

दिनांक